दिनांक :– ३०.०१.२०२३

# प्रेसनोट

**आरोपी लोकसेवक १)मारोती प्रकाश घाटोळे वय ३३ वर्षे, व्यवसाय नौकरी, भुमापक वर्ग–३, उप अधीक्षक, भुमि अभिलेख कार्यालय वसमत रा. टाकळगांव ता.वसमत जि.हिंगोली.यांनी ५०,०००/–रू. लाचेची मागणी करून लाचेची रक्कम २)खाजगी इसम चांदु ईश्वर भदेवाड, वय ३२ वर्षे व्यवसाय भाजी विक्री रा.टाकळगांव ता.वसमत जि.हिंगोली. यांचेकडे देण्याचे सांगीतलेने खाजगी ईसम चांदु ईश्वर भदेवाड यांनी सापळा कारवाई दरम्यान लाचेची रक्कम ५०,०००/– स्विकारलेने त्यांचे विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

---

तक्रारदार यांनी दिनांक २३.०१.२०२३ रोजी तक्रार दिली होती की, तक्रारदार यांचे आईच्या हिश्याला आलेली मौ. वसमत शिवारातील शेत सर्वे नं. २२३ मधील शेती ची कोर्ट आदेशान्वये मोजणी करण्यासाठी लोकसेवक घाटोळे, भुमापक हे ८०,०००/– रू लाचेची मागणी लाचेची मागणी करीत असल्या बाबत तक्रार देण्यात दिली होती.

त्यावरून दिनांक दि.२३.०१.२०२३ व दि.२५.०१.२०२३, रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्यात आली असता लोकसेवक मारोती प्रकाश घाटोळे वय ३३ वर्षे, व्यवसाय नौकरी, भुमापक वर्ग–३, उप अधीक्षक, भुमि अभिलेख कार्यालय वसमत रा. टाकळगांव ता.वसमत जि.हिंगोली यांनी लाचेची रक्कम ५०,०००/– रू. ची लाच स्विकारण्याची सहमती दिलेचे निष्पन्न झाले वरून दि.२७.०१.२०२३ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक मारोती प्रकाश घाटोळे भुमापक यांनी लाचेची रक्कम खाजगी ईसम चांदु भदेवाड यांचेकडे देण्यास सांगीतल्याने दि.३०.०१.२०२३ रोजी सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडुन खाजगी ईसम चांदु भदेवाड याने ५०,०००/– लाचर क्कम स्विकारली.

आरोपी लोकसेवक १)मारोती प्रकाश घाटोळे वय ३३ वर्षे, व्यवसाय नौकरी, भुमापक वर्ग–३, उप अधीक्षक, भुमि अभिलेख कार्यालय वसमत रा. टाकळगांव ता.वसमत जि.हिंगोली. २) चांदु ईश्वर भदेवाड, वय ३२ वर्षे, खाजगी इसम, व्यवसाय भाजी विक्री रा.टाकळगांव ता.वसमत जि.हिंगोली. यांचे विरूध्द पोलीस स्टेशन वसमत शहर गुरन ५१/२०२३ कलम ७, १२ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी मा. डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मा. धरमसिंग चव्हान, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री निलेश सुरडकर, पोलीस निरीक्षक विजय पवार, पोलीस निरीक्षक प्रफुल्ल अंकुशकर, सपोउपनि शेख युनूस,पोहेकॉ श्री विजय उपरे, पोह/विजय शुक्ला, पोह/रवी वरणे,पोना श्री तान्हाजी मुंढे, पोना श्री ज्ञानेश्वर पंचलिंगे, मपोना योगीता अवचार, पोशि श्री राजाराम फुपाटे, पोशि/वाघ, चापोह श्री अकबर अॅ.क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, नांदेड परीक्षे., नांदेड,

मो.नं.९६२३९९९९४४

निलेश सुरडकर, पोलीस उपअधिक्षक लाप्रवि हिंगोली

मो. नं. ९८२२२००९५९

**टोल फ्री क्र.–१०६४**, दुरध्वनी क्र.०२४५६–२२३०५५,